
## सहवेदना

### अरुण मंत्रवादी



**कोल्हापूर :** रेसकोर्स नाका, संभाजीनगर येथील अरुण रंगनाथ मंत्रवादी (वय ७३) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सुन, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### बळवंत गुरव



**गारगोटी :** मिणचे बु. पैकी आप्पाचीवाडी (ता. भुदरगड) येथील बळवंत पाडुरंग गुरव (वय ३३) यांचे निधन झाले. गारगोटी रिक्षा युनियन संघटनेचे अध्यक्ष भारत गुरव यांचे ते जावई होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, आई, वडील, बहिण, भाऊ असा परिवार आहे. उत्तरकार्य गुरुवार२८ रोजी आहे.

### पार्वती काकडे



**कबनूर :** बहिरेवाडी येथील पार्वती शंकर काकडे (वय ७५) यांचे निधन झाले. पांडुरंग काकडे यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात चार मुले, सुना, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे. रक्षाविसर्जन गुरूवार २८ रोजी आहे

### तानुबाई नांगनूरकर.




**चंदगड :** आमरोळी येथील तानुबाई कृष्णा नांगनूरकर (वय ७४) यांचे निधन झाले. 'तरुण भारत'चे पेपर एजेंट शिवाजी नांगनूरकर यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली व नातवंडे असा परिवार आहे.

### महंमदइकबाल नणदी



**जयसिंगपूर :** मौजे आगर (ता. शिरोळ) येथील महंमदइकबाल महंमदसाहेब नणदी (वय ७३) यांचे निधन झाले. एसबीआय शाखा सांगली येथे निवृत्त हेड कॅशियर म्हणून त्यांनी सेवा बजावली होती. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### मारुती मोहिते



**नूल :** येथील नांगरे समाजाचे ज्येष्ठ मार्गदर्शक मारुती महादेव मोहिते (वय ९८) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातवंडे आहेत.

### बाळासो सारंग



**कूर :** कूर (ता.भुदरगड) येथील बाळासो तुकाराम सारंग (वय ६५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, विवाहित मुलगी असा परिवार आहे. उत्तरकार्य २९ नोव्हेंबर रोजी आहे.

### बळवंत सुतार



**कौलव :** सिरसे (ता. राधानगरी) येथील बळवंत दत्तू सुतार (वय ६७) यांचे निधन झाले. पोलीस पाटील सागर सुतार यांचे ते वडील होत. रक्षाविसर्जन २८ रोजी आहे.

### ज्ञानदेव कांबळे



**कोल्हापूर :** दत्ता कॉलनी, कणेरी येथील ज्ञानदेव कोडींबा कांबळे (वय ७५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, नातू, नातवंडे असा परिवार आहे. रक्षाविसर्जन गुरुवार २८ रोजी आहे.

### बाबूमियाँ शिकलगार



**कोल्हापूर :** आझाद गल्ली, बाबूमियाँ मोहिद्दिन शिकलगार (वय ८४)यांचे निधन झाले. जियारत विधी शुक्रवार २९ रोजी आहे.

# कागणी फाट्यावर ग्रामस्थांचा रास्तारोको

## रस्ता दर्जेदार करण्याची मागणी : अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे

वार्ताहर
कुदनूर

कुदनूर ते कागणी रस्त्याच्या दूरावस्थेमुळे परिसरातील संतप्त ग्रामस्थांनी कागणी फाटा येथे रास्तारोको आंदोलन केले. या आंदोलनामुळे कोवाड–बेळगाव, कोवाड–राजगोळी मार्गावरील संपूर्ण वाहतूक तब्बल एक तास रोखून धरण्यात आली होती. यामुळे काही काळ वाहतुक कोंडी निर्माण झाल्याने या मार्गावर एसटी बसेस, अन्य वाहनांच्या लांबच्या लांब रांगा लागल्या होत्या.

आंदोलनस्थळी पोलीस निरीक्षक अशोक सातपुते, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता सासणे, मुख्य अभियंता तुषार बुरूड यांनी उपस्थित राहून आंदोलनकर्त्यांच्या मागण्या ऐकून घेतल्या. अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. कागणी ते कालकुंद्री १.५ कि.मी. अंतराचा रस्ता सहा महिन्यातच खड्डेमय झाला आहे. तर कुदनूर ते कालकुंद्री रस्त्याच्या बाजुपट्ट्या सुमारे २०० फुटापर्यंत वाहून गेल्या आहेत. या दोन्ही रस्त्याच्या दुरावस्थेकडे संबंधीत विभाग दुर्लक्ष करत असल्यामुळे ग्रामस्थांनी रास्तारोको आंदोलनाचे शस्त्र उचलले होते. संबंधीत अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष दुरावस्थेची पाहणी करून २ डिसेंबर पासून कामाला सुरूवात करण्याचे आश्वासन दिले. कालकुंद्री येथे रस्त्यांच्या दुरावस्थेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. यावेळी प्रा. दीपक पाटील, राजू रेडेकर, जनार्दन देसाई, सरपंच विनायक कांबळे, उपसरपंच सुरेश नाईक, बाळासो मुर्डेकर, शिवाजी कोकितकर, अशोक पाटील, शरद जोशी, विकास शेटजी, अन्वर शेख, आप्पाजी वर्पे, गजानन पाटील, गावडू पाटील, एस. पी. पाटील आदी उपस्थित होते.



कालकुंद्री : मुख्य अभियंता तुषार बुरूड यांना रस्त्याच्या दूरावस्थेबद्दल जाब विचारताना आंदोलक.

- बेळगाव, राजगोळी मार्गावर वाहतूक कोंडी
- सार्वजनिक बांधकाम विभाग २ डिसेंबरला काम सुरु करणार
- आंदोलनादरम्यान पोलिसांचा चोख बंदोबस्त

# जुन्या पेन्शन योजनेचा अहवाल प्रकाशित करण्याची मागणी

प्रतिनिधी
कसबा तारळे

राज्यातील सर्व खासगी अनुदानित, अशंतः अनुदानीत व तुकडयावर १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी २४ जुलै २०१९ च्या शासन निर्णयाने संयुक्त समिती गठीत झाली आहे. याचा अहवाल प्रकाशित करून लवकरच हा लाभ मिळवून द्यावा. अशी मागणी प्राथमिक, माध्य व उच्च माध्य. शिक्षक सेवाभावी संघाचे अध्यक्ष दत्तात्रय जाधव यांनी शिक्षण आयुक्त विशाल सोळंकी व शिक्षण संचालक दिनकर पाटील यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात असे म्हटले आहे की, सदर समितीने वरील सर्व बाबींचा अभ्यास करून आपला अहवाल तीन महिन्यात शासनास सादर करणार होती. पण या गठीत केलेल्या समितीची मुदत संपून गेली तरीही कोणताच अहवाल शासनास सादर झालेला नाही. तसेच जुन्या पेन्शन योजनेची खाती अद्यापही उघडली गेली नसल्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना ६ व्या व ७ व्या वेतन आयोगातील फरक मिळावा अशीही मागणी या निवेदनात केली आहे.

**शासनाच्या उदासिन धोरणामुळे आर्थिक कोंडी...**

मी ३१ ऑक्टोंबर २०१९ रोजी वयोमानानुसार सेवानिवृत झालो आहे. मला जुन्या पेन्शनचा लाभ शासनाच्या उदासिन व आडमुठ्या धोरणामुळे मला कोणताही लाभ अध्याप मिळालेला नाही. माझी आत्ता आर्थिक कोंडी झाली आहे. तरी शासनाने तत्काळ हा अहवाल प्रकाशित करुन पेन्शनचा लाभ मिळवून द्यावा.

–शिवाजी पाटील, (सेवानिवृत मुख्याध्यापक)

# फसवणूक केल्याबद्दल बीडच्या ट्रस्टविरोधी तक्रार

वार्ताहर
मुरगूड

व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यासाठीच्या प्रशिक्षण शुल्काच्या नावाखाली ४ लाख ८२ हजार रुपयांची फसवणूक झाल्याबाबतची तक्रार कुरुकली (ता. कागल ) येथील नाविण्य बहुउद्देशीय संस्थेने केली आहे. बीड जिल्ह्यातील आंबेजोगाई येथील श्रीमहालक्ष्मी माता चॅरीटेबल ट्रस्टचे महेश्वर पतंगे, पवन साठे व तानाजी घोडके यांच्याविरुद्धात मोहन गोखले यांनी पोलिसात दिली आहे.

अधिक माहिती अशी, कागल तालुक्यातील कुरुकली येथील मोहन गोखले यांची नाविन्य बहुउद्देशीय ही सामाजिक संस्था आहे. श्रीमहालक्ष्मी माता चॅरिटेबल ट्रस्ट आंबेजोगाई बीड या ट्रस्टचे महेश्वर पतंगे,पवन साठे व तानाजी घोडके यांच्याशी व्यावासायिक प्रशिक्षणासाठी नाविण्य संस्थेने संपर्क केला. त्यानंतर ट्रस्टच्या अग्रीमेंट नाविन्य संस्थेअंतर्गत शिवण क्लास, टॅली, मोबाईल रिपेअरिंग व स्वच्छ अभियानसाठी एकूण १ लाख ९० हजार ५०० रुपये महेश्वर पतंगेच्या बँक खात्यात भरली. याबदल्यात संस्थेला व्यवस्थापन खर्चापोटी प्रमाणे २ लाख ९२ हजार रुपये संस्थेला देण्याचे ई – मेलद्वारे अॅग्रीमेंट ठरले होते.

**आंबेजोगाईच्या ट्रस्ट विरोधात तक्रार**

प्रशिक्षण पूर्ण झालेनंतर नाविण्य संस्थेने सदर कोर्सेसच्या परिक्षा घेणेबाबत,संस्थेच्या परतावा शुल्काबाबत आणि शिलाई मशिन देणेबाबत तसेच संस्थेच्या व्यवस्थापन खर्चापोटी द्याव्या लागणाऱ्या रक्कमेबाबत महालक्ष्मी ट्रस्टला विचारणा केली मात्र त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देत संपर्क करण्याचे टाळले. त्यामुळे नाविण्य संस्थेने ४ लाख ८२ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केली असल्याची तक्रार करण्यात आली.

# आजरा–एरंडोळ मार्गावरील बाजूपट्ट्या धोकादायक

## वृक्ष हटविण्याची मागणी : सार्वजनिक बांधकाम विभागाला ग्रामस्थांचे निवेदन

प्रतिनिधी
आजरा

आजरा–पोळगांव–एरंडोळ रस्त्याच्या बाजूपट्ट्या धोकादायक बनल्या आहेत. शिवाय रस्त्याच्या दुतर्फा अनेक झाडे धोकादायक स्थितीत उभी असून ही झाडे हटविण्याचीही मागणी करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन पोळगांव ग्रामस्थांच्यावतीने सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता बी. आर. कांबळे यांना देण्यात आले.

पोळगांव गावालगत चढ असलेल्या ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा गटारी खोदलेली नाहीत. यामुळे पावसाचे पाणी थेट रस्त्यावरून वाहत असल्याने रस्ता उखडण्याबरोबरच खड्डे लक्षात न आल्याने अनेकदा छोटे–मोठे अपघात होत आहेत. शिवाय पोळगांव गावातून पुढे एरंडोळकडे जाणाऱ्या रस्त्याला पोळगांव गावामध्ये अनेक ठिकाणी अतिक्रमण झाले आहे. या मार्गावर मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. सध्या साखर कारखान्यांचा हंगाम सुरु झाल्याने वाहनांची गर्दी वाढली आहे. रस्त्या लगतच्या गटारी तसेच कुंपण असल्याने समोरासमोर दोन वाहने आल्यास साईट देणेही अडचणीचे ठरू लागले आहे. दोन्ही बाजूच्या बाजूपट्ट्यावर करण्यात आलेले अतिक्रमण हटवून वाहनधारक तसेच ग्रामस्थांची अडचण दूर करावी अशीही मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

बांधकाम विभागाकडून सध्या रस्त्याच्या दुतर्फा असलेली झुडपे हटविण्याचे व गटारी खुदाईचे काम सुरू आहे. या कामाबरोबरच गावातील रस्त्यालगत असलेले अतिक्रमण हटवून होणारी वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्याची गरज आहे. या मार्गावर वाहतूक कोंडीमुळे यापूर्वी काही अपघाताचे प्रसंग घडले असून यापुढे असे प्रसंग निर्माण होऊन वित्त अथवा जिवीत हानी झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागावर राहील असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. या निवेदनावर राजाराम होलम, जोतीबा होलम, नरसू चव्हाण, ज्ञानदेव दोरूगडे, मनोहर शिंत्रे यांच्यासह ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

**ग्रामपंचायतीचा पुढाकार आवश्यक**

आजरा–एरंडोळ हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे चार–पाच वर्षापूर्वी वर्ग झाला आहे. मात्र या रस्त्याची रूंदी किती याची नोंद नसल्याने अतिक्रमणे हटविताना मर्यादा येत आहेत. ग्रामपंचायतीने रस्त्याची वहीवाट कशी होती याची माहिती बांधकाम विभाग व अतिक्रमण धारकांना देऊन सामंजस्याने हे अतिक्रमण हटवावे यासाठी ग्रामपंचायतीने पुढाकार घेणे आवश्यक आहे.

– बी. आर. कांबळे
उपअभियंता सार्वजनिक बांधकाम, आजरा

# 'हुपरी–कोल्हापूर रस्त्याचे डांबरीकरण तत्काळ करा'

वार्ताहर
उचगाव

हुपरी–कोल्हापूर रस्ता टेंबलाई मंदिर ते उचगाव हायवे चौक ते गडमुडशिंगी रस्त्यापर्यंत अत्यंत खराब झाला असून तो तत्काळ डांबरीकरण करावे याबाबतचे निवेदन सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे उपअभियंता डी. आर. भोसले यांना करवीर शिवसेनेच्यावतीने देण्यात आले.

यावेळी करवीर शिवसेना तालुकाप्रमुख राजू यादव म्हणाले, हा रस्ता कर्नाटकातही जात असल्याने तेथे मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. टेंबलाई मंदिर पासून पुढे उचगाव हायवे उड्डाणपुलापर्यंत मोठे खड्डे रस्त्याला पडल्याने वाहनधारक खड्डे चुकवण्याच्या नादात छोटे मोठे अपघातही झाले आहेत. तसेच सायकलवरून शाळेला जाणारी मुले, मुली किंवा विद्यार्थी वाहतूक रिक्षा असेल ह्या मोठ्या मोठ्या खड्डयाने ते वाहनधारक हैराण झाले आहेत. त्यामुळे तत्काळ टेंबलाई मंदिर ते उचगाव उड्डाणपुला पर्यंत डांबरीकरण करण्यात यावे. ह्या रस्त्यावर अपघात झाल्यास सर्वस्वी आपणास जबाबदार धरण्यात येईल. यावेळी अधिकाऱ्यांनी दोन महिन्यात रस्ता डांबरीकरण करण्याचे आश्वासन शिवसेनेच्या शिष्टमंडळाला दिले.

यावेळी करवीर तालुका प्रमुख राजू यादव, राजू सांगावकर, दिनेश परमार, कैलास जाधव, शफीक देवळे, दिलीप सावंत, बाबुराव पाटील, दीपक पोपटानी, सुनील परापाणी, भूषण चौगुले, प्रफुल्ल घोरपडे, सागर पाटील, सचिन नागटीळक, सुभान फुलवाले, अनिल जाधव, ओंकार पाटील, योगेश लोहार, अमोल विटेकरी, जयपाल शिंदे, आनंद जाधव आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : हूपरी–कोल्हापूर रस्त्याचे डांबरीकरण करा, या आशयाचे निवेदन डी. आर. भोसले यांना देताना राजू यादव, राजू सांगावकर, दिनेश परमार व शिवसैनिक.

# ट्रक चोरीप्रकरणी चालकास अटक

**हातकणंगले :** चोरटी वाळू वाहतूक केल्याप्रकरणी जप्त करण्यात आलेला ट्रक चोरुन नेल्याप्रकरणी पोलिसांनी संशयित ट्रकचालक कृष्णा साबू कारंडे (वय ४०, रा. हातखंबा, जि. रत्नागिरी) याला बुधवारी अटक केली. याबाबत हातकणंगले पोलिसांत नोंद झाली आहे. याबाबतची अधिक माहिती अशी, चोरटी वाळू वाहतूक केल्याप्रकरणी ट्रक दोन महिन्यापूर्वी जप्त करण्यात आला होता. हा ट्रक हातकणंगले तहसील कार्यालय आवारात लावण्यात आला होता.

# वाकीघोल परिसरात डेंग्यूचे थैमान

वार्ताहर
आडोली

राधानगरी तालुक्यातील वाकीघोल परिसरात डेंग्यूच्या साथीने थैमान घातले असून अनेक नागरिकांमध्ये त्याची लक्षणे आढळून आले आहेत. संबंधित आरोग्य विभागाने याची दखल घेऊन या परिसरात सुविधांचा पाठपुरावा करावा, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

आडोली परिसरातील भीमराव कांबळे, दुबळेवाडी येथील प्रकाश श्रीपती केसरकर आदीसह पाच लोकांची रिपोर्ट डेंगू सदृश्य आल्याने त्यांचेवर गारगोटी येथील आरोग्य केंद्रात उपचार सुरू आहेत. त्यामुळे या परिसरात घबराटीचे वातावरण तयार झाले आहे. आडोली येथे प्राथमिक आरोग्य केंद्राची उपकेंद्र आहे. परंतु याठिकाणी डॉक्टर हजर नसल्याने व उपकेंद्रासाठी इमारतीची सोय नसलेली येथील उपकेंद्राचा नागरिकांना कोणताही लाभ मिळत नाही. तरी संबंधित विभागाने योग्य ती दखल घेऊन उपाययोजना करावी,तसेच स्थानिक प्रशासनाने या आजराबाबत जनजागृती करावी अशी मागणी तंटामुक्त अध्यक्ष ज्ञानदेव पाटील यांनी केली आहे.

# यशवंतराव चव्हाण यांना भोगावती कारखान्यात अभिवादन



भोगावती : भोगावती कारखान्यातयशवंतराव चव्हाण यांना अभिवादन करताना उपाध्यक्ष उदयसिंह पाटील, कृष्णराव किरूळकर आदी.

प्रतिनिधी
भोगावती

स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या स्वप्नातील महाराष्ट्र उभा करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरणार आहे, असे प्रतिपादन भोगावती सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष उदयसिंह पाटील कौलवकर यांनी केले.

शाहूनगर परिते येथील भोगावती साखर कारखान्यात स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जेष्ठ संचालक कृष्णराव किरूळकर होते. प्रारंभी स्व. चव्हाण यांच्या प्रतिमेचे पुजन जेष्ठ संचालक व राधानगरी तालुका कॉंग्रेसचे अध्यक्ष हिंदुराव चौगले यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक आर.डी. पाटील यांनी केले.

# कुरुंदवाड येथे फसवणुकीचा प्रयत्न

**कुरुंदवाड :** येथील एका नामांकित राष्ट्रीयीकृत बँकेत दोन भामट्यांनी बनावट सोनेतारण करून रक्कम हडपण्याचा प्रयत्न केला होता. मात्र बँक अधिकाऱ्यांच्या व सोनाराच्या सतर्कतेने बँकेची फसवणूक टळली. दरम्यान बँकेच्या अधिकाऱ्यांनी पोलिसांशी संपर्क साधल्याची कुणकुण दोन भामट्यांना लागताच त्यांनी पलायन केले. पसार झालेल्या युवकांचा शोध पोलीस घेत आहेत. सोनेतारण करण्यासाठी आलेल्या दोन भामट्यांनी शहरातील एका तरुणाच्या मदतीने हा प्रयत्न केल्याचे समजते. पोलिसांनी त्या युवकाची चौकशी सुरू केल्याचे माहिती सहाय्यक फौजदार राजेंद्र उगलमुगले यांनी दिली.


## प्रथम स्मृतिदिन



ध्यानी मनी नसताना अचानक आपण आमच्यातून निघून जाऊन आज एक वर्ष होत आहे. आपल्या प्रेमळ मायेची सावली, आशीर्वाद, मार्गदर्शनाची शिदोरी पाठीशी घेऊन आमच्या जीवनाची वाटचाल करत राहू. तुमच्या पवित्र आत्म्यास चिरशांती लाभो, ही ईश्वरचरणी प्रार्थना..!

कै. सौ. सुनंदा यल्लाप्पा कांबळे
(मृत्यू दि.२८/११/२०१८)

जो आवडे सर्वांना, तोची आवडे देवाला..!

- पती– यल्लाप्पा लगमाण्णा कांबळे (सर)
- मुले – कु. ऋतुजा, चि. श्रीराज
- भाऊ– प्रभू मारुती कांबळे

कांबळे परिवार व पाहुणे मंडळी, तेऊरवाडी, ता. चंदगड

## १९ वा स्मृतिदिन

स्मृती तुझी होता,
येते नयनातूनी पाणी।
जाणार इतक्या लवकर
जाणले नव्हते कुणी॥
मनी आमच्या राहतील
तुझ्या गोड आठवणी।
उर भरुनी येता,
असे वाटते यावेस
तू परतूनी॥



कै. सुप्रिया (गुड्डी) मारुती संकपाळ

: तुझेच :

श्री.मारुती संकपाळ • सौ.अलका संकपाळ • श्री.दिलीप शिंदे • सौ.वंदना शिंदे • ऋषिकेश • सुयोग • प्रियांका • सुमित • प्रज्ञा • विठाबाई (आजी)

समस्त संकपाळ, शिंदे व चव्हाण परिवार, कागल, ता.कागल

## ऋणनिर्देश



कै. श्रीमती यशोदा सुबराव बिर्जे
(मृत्यू दि. १८/११/२०१९)

आमच्या घरच्या मार्गदर्शिका **श्रीमती यशोदा सुबराव बिर्जे** यांचे सोमवार दि. १८ नोव्हेंबर २०१९ रोजी दु:खद निधन झाले. या दु:खदप्रसंगी आमचे नातेवाईक, मित्रमंडळी, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी आम्हाला आधार देऊन आमचा दु:खभार हलका करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे आम्ही ऋणी आहोत. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना...!

- सुना : श्रीमती मंजुळा कलाप्पा बिर्जे, श्रीमती शांता गुंडू बिर्जे
- मुली : सौ.अलका पाटील (कोवाड), सौ.शालन इंजल (माडवळे)
- श्री.सुबराव कलाप्पा बिर्जे, श्री.अनिल कलाप्पा बिर्जे
- श्री.कपिल गुंडू बिर्जे, श्री.गजानन गुंडू बिर्जे

बिर्जे परिवार, किणी, ता.चंदगड, जि.कोल्हापूर

टीप : उत्तरकार्य गुरुवार दि. २८/११/२०१९ रोजी आहे.

## फॉर्म ए
### जाहीर घोषणा

(भारतीय नादारी व दिवाळखोरी मंडळाच्या विनिमय ६ अंतर्गत कार्पोरेट व्यक्तींकरिता नादारी ठराव प्रक्रिया) विनिमय, २०१६ **जीकेसी प्रोजेक्ट लिमिटेड**च्या धनकोंनी लक्ष देण्याकरिता

| | संबंधित तपशील | |
|---|---|---|
| १ | कार्पोरेट ऋणकोचे नाव | **मे. जीकेसी प्रोजेक्ट लिमिटेड** |
| २ | कार्पोरेट ऋणकोच्या विधी संस्थापनाची तारीख | ०५-०४-२००४ |
| ३ | प्राधिकरण ज्या अंतर्गत कार्पोरेट ऋणको विधी संस्थापित/नोंदणीकृत आहेत. | आरओसी – हैद्राबाद |
| ४ | कार्पोरेट ऋणकोचा कार्पोरेट आयडेंटिटी नंबर/लिमिटेड लायबिलिटी आयडेंटिफिकेशन नंबर | U45200TG2004PLC043015 |
| ५ | कार्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालय आणि प्रधान कार्यालयाचा (जर असल्यास पत्ता) | सर्व्हे नं. ९ (पी), सीII, ग्रीन बिल्डींग लाईन, हायटेक सिटी, कोंडापूर, हैद्राबाद, तेलंगणा, ५०००८४, भारत |
| ६ | कार्पोरेट ऋणकोच्या बाबतीत नादारी सुरु झाल्याची तारीख | २१-११-२०१९ (दि. २५/११/२०१९ आदेश स्वीकृत झालेली तारीख आहे) |
| ७ | नादारी ठराव प्रक्रिया बंद होण्याची अंदाजित तारीख | १८-०५-२०२० |
| ८ | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून कार्यरत असलेल्या नादारी व्यावसायिकेचे नांव व नोंदणी क्रमांक | **मधुसुदन राव गोनुगुंटा आणि IBBI/IPA-001/IP-P00181/2017-18/10360** |
| ९ | मंडळाकडे नोंदणीकृत असल्याप्रमाणे अंतरिम ठराव व्यावसायिकेचा पत्ता व ई-मेल | ७-१-२८५, फ्लॅट नं. १०३, श्री साई स्वप्न संपदा अपार्टमेंट्स्, बालका पेठ, संजीव रेड्डी नगर, हैद्राबाद, तेलंगणा ५०००३८. madhucs1@gmail.com |
| १० | अंतरिम ठराव व्यावसायिकेशी तत्सम वापरावयाचा पत्ता व ई–मेल | ७-१-२८५, फ्लॅट नं. १०३, श्री साई स्वप्न संपदा अपार्टमेंट्स्, बालका पेठ, संजीव रेड्डी नगर, हैद्राबाद, तेलंगणा ५०००३८. gkcirp@gmail.com, madhucs1@gmail.com |
| ११ | दाबांच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख | ०९-१२-२०१९ |
| १२ | अंतरिम ठराव व्यावसायिकेद्वारा निश्चित केलेल्या, कलम २१ च्या पोटकलम (६ए) च्या खंड 'बी' अंतर्गत धनकोंचा वर्ग, जर असल्यास | **खातेबुकाच्या पडताळणीनंतर आढळून आले नाही.** |
| १३ | वर्गात धनकोंचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून कार्यरत ज्ञात नादारी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गाकरिता तीन नावे) | लागू नाही |
| १४ | (ए) संबंधित फॉर्मस् आणि (बी) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील येथे उपलब्ध आहे. | **वेबलिंक :** https://www.ibbi.gov.in/ home/downloads प्रत्यक्ष पत्ता : लागू नाही |

याद्वारा सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा व्यावसायिकरणाने २१-११-२०१९ रोजी मे. जीकेसी प्रोजेक्ट लिमिटेडकरिता कार्पोरेट नादारी ठराव प्रक्रिया सुरु करण्याचा आदेश दिला आहे. **मे. जीकेसी प्रोजेक्ट लिमिटेड**च्या धनकोंना याद्वारा एन्ट्री नं. १० च्या अनुसार नमूद केलेल्या पत्त्यावर अंतरिम ठराव व्यावसायिक याकरिता ०९-१२-२०१९ रोजी किंवा तत्पूर्वी पुराव्यांसह त्यांचे दावे सादर करण्याकरिता फर्माविण्यात आले आहे. वित्तीय धनको केवळ इलेक्ट्रॉनिक प्रणालीत पुराव्यासह त्यांचे दावे सादर करतील. अन्य सर्व धनको व्यक्तिशः, टपालाने किंवा इलेक्ट्रॉनिक प्रणालीत दावे सादर करु शकतील. एन्ट्री क्र. १२ मध्ये सूचीबद्ध, केल्याप्रमाणे वर्गाचा वित्तीय धनकडे वर्गाचा अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता (वर्ग नमूद करा) एन्ट्री क्र. १३ मध्ये सूचीबद्ध केलेल्या तीन नादारी व्यवसायीकातूनच अधिकृत प्रतिनिधी म्हणून निवड करावी व तसे नमूद करावे. फॉर्म सीएमध्ये - सध्या लागू नाही. खोटे किंवा दिशाभूल करणाऱ्या दाव्यांचे सादरीकरण झाल्यास दंड आकारला जाईल.

**दिनांक : २७/११/२०१९**
**स्थळ : हैद्राबाद**

**अंतरिम ठराव व्यावसायिकांची नाव आणि स्वाक्षरी**
**सही/– मधूसुदन राव गोनुगुंटा**

## मुथुट होमफिन (इंडिया) लि.,

Muthoot Finance

**क्षेत्रिय कार्यालय : १२०१ आणि १२०२, १२वा मजला, 'ए' विंग, लोटस कॉर्पोरेट पार्क, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवेवर, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३.**

### मागणी सूचना

दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस्, ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ (१) सह वाचण्यात आलेल्या कलम १३ (२) अंतर्गत.

निम्नस्वाक्षरीकार हे मुथुट होमफिन (इंडिया) लि., चे (एमएचआयएल) सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सदर कायदा) अंतर्गत प्राधिकृत अधिकारी आहेत. सदर कायद्याच्या कलम १३(२) तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ सह वाचण्यात आलेल्या कायद्याप्रमाणे प्रदत्त अधिकारांचा वापर करीत सदरच्या कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गत अधिकृत अधिकाऱ्यांनी मागणी सूचना निर्गमित करुन खालील कर्जदारांना (''सदर कर्जदार'') संबंधित मागणी सूचनेत नमूद रक्कम जी येथे खाली देण्यात आली आहे, त्याची परतफेड करण्याचे आवाहन केले होते. वरील संदर्भात, याद्वारे कर्जदारांना पुन्हा एकदा सूचना देणेत येते की, खाली निर्देशित करण्यात आलेली रक्कम, त्यावरील दरमहा २% व्याज जी सविस्तरपणे मागणी सूचनेत नमूद करण्यात आली आहे, जी एमएचआयएलला देय आहे, ती रक्कम सदर सूचना प्रसिध्द होण्याच्या ६० दिवसांच्या आत कर्ज करारात नमूद केल्याप्रमाणे भरणा करावी. कर्जाच्या परतफेडीसाठी प्रतिभूती म्हणून खाली मालमत्ता कर्जदारांनी अनुक्रमे एमएचआयएल कडे तारण ठेवली आहे.

| अ. क्र. | कर्जदार/सहकर्जदाराचे नाव/ कर्ज खाते क्र. /शाखा | एकूण थकबाकी रक्कम (रु.) | मागणी सूचना दिनांक | सुरक्षित मालमत्तेचे विवरण (स्थावर मालमत्ता) |
|---|---|---|---|---|
| १ | **सागर आनंदा माने / अक्षय आनंदा माने / ००९-००९०१०१३/कोल्हापूर** | **रु. १५,७३,२१२/–** (रुपये पंधरा लाख त्र्याहत्तर हजार दोनशे बारा फक्त) | २६-०९-२०१९ | प्लॉट नं. ५४, आर. एस. नं. १७९, मिळकत नं. ६४६२, मराठा कॉलनी, रा. पाचगाव, ता–करवीर, कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६०१३ |
| २ | **विनोद शिवाजी दोरकर / विद्या विनोद दोरकर / ००९-००००००००१/कोल्हापूर** | **रु. १२,९७,२४२/–** (रुपये बारा लाख सत्त्यान्नऊ हजार दोनशे बेचाळीस फक्त) | ०३-१०-२०१९ | रॉ बंगलो युनिट नं. १९, प्लॉट नं. ३, एस. नं. ३४५/१४, हुपरी रोडच्या पश्चिमेला, कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६००५ |

वर उल्लेख केल्याप्रमाणे जर सदर कर्जदारांनी रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्यास एमएचआयएल सदर सुरक्षित मालमत्तेसंदर्भात सदर कायद्याच्या कलम १३(४) आणि लागू नियमानुसार कार्यवाही हाती घेईल आणि याचा खर्च आणि परिणामाला संपूर्णपणे सदर कर्जदारच जबाबदार राहील.

एमएचआयएलच्या लेखी पूर्वसंमतीशिवाय उपरोल्लेखित मालमत्तेचे विक्री, भाडेपट्टी किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करण्यास सदर कर्जदारांना मज्जाव करण्यात आला आहे. सदर कायदा किंवा नियमाच्या तरतुदींचे कोणत्याही व्यक्तीने उल्लंघन किंवा उल्लंघन करण्यास प्रोत्साहन दिल्यास कायद्यांतर्गत तरतूद करण्यात आलेल्या कारावास किंवा दंड या शिक्षेस पात्र असेल.

स्थळ : महाराष्ट्र
दिनांक : २८.११.२०१९

सही/– **अधिकृत अधिकारी**
**मुथुट होमफिन (इंडिया) लि., करीता**